ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 9 | ISSUE - 2 | OCTOBER - 2022

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# महात्मा जोतीराव फुले यांचे पाणी व्यवस्थापन विषयक विचार : एक अभ्यास

**श्री. मुकुंद का. गोरे**
[१]एम.ए.(अर्थशास्त्र, मराठी),
एम.फिल.(अर्थशास्त्र),
नेट(अर्थशास्त्र), एम.एड., नेट (शिक्षणशास्त्र),
डीएसएम, पीएच. डी. संशोधक विद्यार्थी,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**प्रा.डॉ.नंदकुमार बोधगीरे**
एम.ए. (अर्थशास्त्र), नेट (अर्थशास्त्र),
पीएच. डी. (अर्थशास्त्र)
सहायक प्राध्यापक, उपयोजित अर्थशास्त्र विभाग,
सामाजिक शास्त्रे संकुल, स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

## प्रस्तावना



भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतातील बहुसंख्य लोक खेड्यात राहतात. शेती हा या देशातील बहुसंख्य लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. देशातील श्रम करणारा शेती पिकवणारा शेतकरी वर्ग सतत उपेक्षित राहिला आहे. जोतीराव फुले हे या देशातील शेतकऱ्यांच्या समस्यांना वाचा फोडणारे विचारवंत आणि कर्ते सुधारक होते. त्यांनी मुंबईत भायखळा येथे शेतकऱ्यांची स्थिती या विषयावर १० डिसेंबर १८८२ रोजी एक व्याख्यान दिले. त्यापूर्वी १८७८ मध्ये फुले हे मामा परमानंद यांना मुंबईत भेटले होते तेव्हा शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत शेतकऱ्याचा असूड हे पुस्तक लिहिण्याचा आपला विचार असल्याचे त्यांना सांगितले व १८८३ मध्ये शेतकऱ्यांचा असूड हा ग्रंथ त्यांनी लिहिला. जोतीरावांनी आपल्या विहिरीवर व हौदावर पाणी भरण्याकरिता इ. स. १९६८ साली अस्पृश्य लोकांना परवानगी दिली. जोतीरावांचा तो हौद आजही 'फुल्यांचा हौद' म्हणून पुण्यात प्रसिध्द आहे. यावरून पाण्याबाबतही समानतेची शिकवण त्यांनी दिली आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घेऊन स्वत: कृती करून पाण्याचे व्यवस्थापन कसे करावे हे सांगून शेतीचा पर्यायाने शेतकऱ्यांचा विकास कसा होईल याबाबत त्यांनी उल्लेखनीय असे कार्य केले आहे.

## समस्या सूत्रण :

महात्मा फुले याच्या पाणी व्यवस्थापन विषयक विचारांचा त्यांनी लिहिलेल्या विविध ग्रंथांमधून (विशेषतः शेतकऱ्याचा असूड व इशारा) शोध घेणे, पाणी व्यवस्थापनविषयक त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेणे. तसेच पाणी व्यवस्थापनविषयक सांगितलेल्या उपाययोजनांचा अभ्यास करून पाणी व्यवस्थापनविषयक विचारांची वर्तमानकालीन उपयुक्तता अभ्यासणे हा या प्रस्तुत लेखाचा मुख्य उद्देश आहे.

## संदर्भ साहित्य :

प्रस्तुत संशोधन लेखाकरिता महात्मा फुले यांनी स्वत: लिहिलेल्या शेतकऱ्याचा असूड व इशारा या ग्रंथांचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच कीर धनंजय यांनी संपादित केलेले 'महात्मा फुले समग्र वाड.मय', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई तसेच हरी नरके, फडके (१९९१) यांनी संपादित केलेला महात्मा फुले गौरव ग्रंथ, खंड पहिला, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई तसेच डॉ. अशोक चौसाळकर लिखित (१९९०) महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ, लोकवाङमय गृह , मुंबई., ग.द. माळी (गुरुजी) (१९६७) महात्मा ज्योतिबा फुले, सुनील प्रकाशन, धुळे त्याचप्रमाणे कीर, धनंजय, महात्मा जोतीराव फुले -आमच्या समाज क्रांतीचे जनक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई तसेच पाटील पंढरीनाथ, म. जोतीराव फुले (दुसरी आवृत्ती), मनोविकास प्रकाशन, मुंबई १९८९. यांसारख्या संदर्भ ग्रंथांचा आधार घेण्यात आला आहे.

## उद्दिष्टे:

१) महात्मा फुले यांच्या पाणी व्यवस्थापन विषयक विचारांचा शोध घेणे.
२) महात्मा फुले यांनी पाणी व्यवस्थापनविषयक केलेल्या कार्याचा आढावा घेणे.
३) महात्मा फुले यांनी पाणी व्यवस्थापनविषयक सांगितलेल्या उपाययोजनांचा अभ्यास करणे .
४) महात्मा फुले यांच्या पाणी व्यवस्थापनविषयक विचारांची वर्तमानकालीन उपयुक्तता अभ्यासणे .

## गृहीतके:

१) महात्मा फुले यांचे पाणी व्यवस्थापन विषयक विचार आजही भारतीय शेतीसाठी अत्यंत उपयुक्त आहेत.
२) त्यांचे विचार आजही भारतीय कृषिला विकासाकडे घेऊन जाणारे आहेत.
३) सद्यस्थितीतही शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न हा गंभीर स्वरूपाचा असून महात्मा फुले यांनी सांगितलेल्या उपाययोजना प्रेरणादायी आहेत.
४) वाढत्या लोकसंख्येमुळे दरडोई पाण्याची उपलब्धता कमी होत चालली आहे. तसेच, वाढते शहरीकरण व औद्योगिकीकरणामुळे जलव्यवस्थापनावरील ताण वाढत चालला आहे. परिणामी पाणी व्यवस्थापन हे २१ व्या शतकातील एक प्रमुख आव्हान झाले आहे.

## संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधन लेखासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. माहितीचे संकलन हे द्वितीयक स्वरूपाच्या स्त्रोतांच्या आधारे करण्यात आले आहे.

## आशय विश्लेषण :

महात्मा जोतीराव फुले (१८२७-१८९०) यांनी आपले कार्य मुख्यतः १९ व्या शतकात केले. १९ व्या शतकातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीचा जोतीरावांच्या विचारावर मोठा प्रभाव पडला होता. या काळातील आर्थिक विचार, आर्थिक रचना, राज्यव्यवस्था तसेच सामाजिक विचार हे मागासलेले होते. सरंजामशाही शेतीव्यवस्था कमी-जास्त बदलासह कायम होती. महाराष्ट्रातील शेतकरी स्वकीयांकडून व परकीयांकडून नाडला जात होता. जोतीरावांनी या अन्यायाविरुद्ध लढा उभारला आणि आपल्या आयुष्यभर शेतकऱ्यांच्या प्रबोधनासाठी कृतीयुक्त प्रयत्न केले.

सत्यशोधक समाज स्थापन झाल्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांचा प्रश्न महत्त्वाचा समजून त्या विषयावर व्याख्याने द्यावयास तसेच लिखाणास सुरुवात केली. सत्यशोधक समाजातर्फे भरविण्यात आलेल्या सभेत फुल्यांनी

"स्वदेशीय म्हणविणाऱ्या राजापेक्षा परदेशी राजाकडून कालव्याच्या संबंधीने शूद्र लोकांचा किती फायदा झाला?" या विषयावर निबंध वाचला. त्यानंतर सतत दुष्काळ का पडतात ? शूद्र त्यात बळी का पडतात? दुष्काळ टाळण्यासाठी उपाय काय करावे? या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. १८७७ साली दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांसाठी बालाश्रम काढण्यात आला. खडकवासला कालवा झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात शेतकरी पाण्याचा व्यवस्थित वापर करीत नव्हते पण त्यांना शेती कशी करावी हे समजावून सांगण्यासाठी त्या भागात स्वतः जोतीरावांनी जमीन घेतली. नव्या पद्धतीने यशस्वीपणे शेती करून दाखविली.

डॉ. रवींद्रकुमार यांच्या मते, त्या काळात महाराष्ट्रातील शेतकरी समूह प्रामुख्याने तीन भागात विभागलेला होता. त्यातील शेकडा १० टक्के शेतकरी हे सुखवस्तू होते आणि त्यांच्याजवळ चांगल्या मगदूराच्या जास्त जमिनी होत्या. त्यांच्याजवळ स्वतःचा बैल, बारदाना आणि शेतीचा सरंजाम होता. शेतकरी समूहाच्या दुसऱ्या थरात सुमारे ४० टक्के शेतकऱ्यांचा समावेश होत होता. त्यांच्याजवळ मध्यम दर्जाची २० ते ७० एकरपर्यंत जमीन होती. हे सारे कोरडवाहू शेती करणारे शेतकरी होते. हे शेतकरी मोठ्या प्रमाणात कर्जबाजारी झालेले होते. अज्ञान व रोगराईने पिडलेले होते. एक दोन हंगाम खराब गेले की त्यांची परिस्थिती अतिशय खराब बनत असे. सावकारशाहीने हा वर्ग पुरता नाडला होता. उरलेले ५० टक्के शेतकरी दहा-पंधरा एकर जमीन असणारे छोटे शेतकरी होते. त्यांची अवस्था मोठी दयनीय होती. त्यांना कोणी कर्ज देत नसे. त्यांच्याजवळ बैल, बारदाणाही नसे. त्यातच भाऊ हिस्से होऊन शेतीचे तुकडे झाले की ते जास्तच गरीब बनत आणि परिणामी शेतमजूर बनत. दुष्काळात काढलेल्या कामावर खडी फोडण्यासाठी या वर्गातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर जात असे. या शेतकऱ्यांतील तीन थरांपैकी ज्याच्या शेताला बारमाही पाणी मिळत होते, तोच शेतकरी थोडासा सुखी होता. बाकी शेतकरी सरकार, सावकार, व्यापारी, दलाल आणि नोकरशाही यांनी पिडलेले होते.

इंग्रजांनी युरोपातील सावकारांकडून कालवे बांधण्यासाठी कर्ज काढले होते. या सावकारांना महामुर म्हणजेच भरपूर व्याज दिले व ते सर्व कर्ज भारतावर लादले. या कालव्याच्या पाण्याचा दरही फार जास्त होता. वाढीव दर देऊनही शेतकऱ्यांना शेतासाठी योग्यवेळी पाणी मिळत नव्हते. याकडेही महात्मा फुले यांनी सरकारचे लक्ष वेधले होते.

महात्मा फुलेंनी शेती व पाणी या विषयावर 'इशारा' या पुस्तिकेमध्ये त्यांचे विचार मांडले आहेत. महात्मा फुले यांच्या मते शेतीच्या विकासासाठी पाणी असणे मोठे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना पाणी मिळाले तर ते खराब जमिनीवरही चांगले पीक काढू शकतात. खडकाळ जमिनीतही चांगले उत्पन्न निघू शकते. पाणी गेले की शेतकऱ्यांचे ऐश्वर्यही संपते. सृष्टीक्रमाप्रमाणे पर्जन्य कोणत्याही एका भागावर पडला तर दुसऱ्या भागावर पडत नाही. त्यामुळे शेतकरी लोकांना अन्नधान्याची तूट पडते. त्यामुळे सतत बारा महिने कॅनालने पाणी मिळाले तर शेतकऱ्यांसाठी ती चांगलीच गोष्ट आहे असे त्यांचे मत होते.

ज्या भागात पाटबंधारे खात्याचे कालवे आहेत त्या भागातील पाणी सोडणारे कामगार हे बेपर्वा आणि भ्रष्टाचारी आहेत. फुले सांगतात की, सरकारचा पाणीपट्टीचा दर जास्त, पण इंग्रज कामगार त्याकडे लक्ष देत नाहीत. भट कामगार शेतकऱ्यास वेळेवर पाणी देत नाहीत. पाणी देण्याऐवजी ते शेतकऱ्यांशी अरेरावीची व उद्धट अशी भाषा करतात. पुन्हा सरकार सांगते की, वक्तशीर पाणी न मिळाल्यामुळे जर शेतकऱ्यांचे काही नुकसान झाले तर त्यास सरकार जबाबदार राहणार नाही. फुले लिहितात की, हजारो रुपये पगार घेणाऱ्या इंजिनिअर लोकांना धरणात किती गॅलन पाणी आहे याचा अंदाज असणे जरुरी आहे. त्याप्रमाणेच त्यांनी पुढे पाणी अखेरपावेतो जेवढ्या जमिनीत पुरेल तितक्याच जमिनीच्या मालकास पाणी घेण्याची परवानगी द्यावी. त्यांच्या बेहिशोबीपणामुळे शेतकऱ्याचे नुकसान होते म्हणून जोतीरावांनी अशी मागणी केली की, सरकारने शेतकऱ्यास वेळेवर पाणी दिले पाहिजे. त्याचप्रमाणे सरकारने प्रत्येक शेतकऱ्यास शेताच्या पाण्याच्या मानाने प्रत्येकास एकेक तोटी करून द्यावी जेणेकरून

शेतकऱ्यास वाजवीपेक्षा जास्त पाणी घेता येऊ नये. त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होईल व सरकारच्याही पैशाची बचत होईल. आज महाराष्ट्रात पाणी वाटपाची जी चर्चा सुरू आहे तिला सुरुवात अशा प्रकारे जोतीरावांनीच करून दिली आहे.

## स्वकृतीतून आदर्श :

जोतीराव फुलेंच्या काळात महाराष्ट्रातील शेतकरी अज्ञानी व अंधश्रद्धाळू होता. त्यामुळे देखील तत्कालीन शेतकरी वर्गाला दारिद्य आणि मागासलेपणाचा सामना करावा लागे. मुळा मुठा नदीवरील धरणाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर अगदी प्रारंभीच्या काळात या धरणाचे पाणी शेतकरी गैरसमजापोटी उपयोगात आणत नसत. उदाहरणार्थ सरकारला जनतेकडून जमीन काढून घ्यावयाची आहे. धरणाच्या पाण्यामुळे शेती पाण्याखाली जाईल. जोतीराव फुले देखील सरकारचे हस्तक आहेत अशा प्रकारचे काही गैरसमज शेतकरी वर्गात त्याकाळी निर्माण झाले होते.

शेतकरी वर्गातील वरील गैरसमज अथवा अज्ञान दूर करून त्यांनी धरणाच्या पाण्याचा जास्तीत जास्त उपयोग करून आपल्या आणि राष्ट्राच्या विकास कार्यास हातभार लावावा असे जोतीरावांना वाटत होते. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील असंख्य गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील शेतकऱ्यांमध्ये जागृती घडवून आणण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य केले. या कार्यात त्यांना सुरुवातीच्या काळात अपयश आले. परंतु जेव्हा स्वतः जोतीरावांनीच धरणाचे पाणी आपल्या शेतीला देण्यासाठी एक सुंदर बगीचा तयार केला. तसेच धरणाच्या पाण्यापासून अत्यंत उत्तम प्रकारची पिके घेऊन चांगले उत्पादन मिळवता येते ही गोष्ट जोतीरावांच्या शेतीकडे पाहून असंख्य शेतकऱ्यांच्या लक्षात आली त्यानंतर अनेक शेतकरी धरणाचे पाणी घेऊन उत्पादन काढू लागले.

धरणाच्या पाण्याचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करून घेता यावा या हेतूने जोतीरावांनी आपल्या शेताजवळून एक नाली खोदून एक नळी घेतली होती. तेव्हापासून ते आजतागायत ही नळी फुल्यांची नळी म्हणून प्रसिद्ध आहे आणि विशेष म्हणजे आजही ती पुण्यातील मांजरी येथे सुरू आहे. ते आपल्या मळ्यात अनेक प्रकारची स्वदेशी व विदेशी पिके फळे आधी फुले घेत असत. तत्कालीन शेतकरी अज्ञान व गैरसमजामुळे विदेशी पिके घेत नसत. परंतु जोतीराव फुले या विदेशी पिकाची लागवड करून मोठ्या प्रमाणात पैसा मिळवतात हे जेव्हा त्या शेतकऱ्यांच्याही लक्षात आले तेव्हा मात्र त्यांनीही विदेशी पिकांचे उत्पादन आपल्या शेतीमध्ये घेण्यास सुरुवात केली.

धरणाच्या पाण्यापासून शेतीमध्ये मोठ्या प्रमाणावर ऊसाची लागवड करून उसापासून गूळ तयार करण्याच्या हेतूने जोतीरावांनी सुमारे २५ एकर उसाची लागवड केली होती. यापासून त्यांना प्रतिवर्षी हजारो रुपये किमतीच्या गुळाचे उत्पादन होत असे. अशा प्रकारे स्वकृतीतून आधुनिक शेती पाण्याच्या व्यवस्थापनाद्वारे कशी करावी याचा आदर्श वस्तूपाठच त्यांनी सर्व शेतकऱ्यांना दाखवून दिला होता.

## पाणी व्यवस्थापनाबाबतच्या महात्मा फुले यांनी सुचविलेल्या काही उपाययोजना

१. प्रत्येक शेतावर बांध घालून जमिनीची धूप थांबवावी आणि शेतातील पाणी शेतातच जिरवावे. यामुळे नद्याही कोरड्या पडणार नाहीत आणि त्यांना महापूरही येणार नाहीत. लहान लहान ओढ्यावर बांध घातल्याने ते वर्षभर वाहते ठेवता येतील आणि शेतीसाठी कायम पाणीपुरवठा होईल.

४. एकंदर सर्व नदी नाले व तळी तलावात साचलेला गाळ शेतकऱ्याला फुकट नेऊ द्यावा यामुळे नदी नाले यात पाण्याचा अधिक साठा होईल व याचा उपयोग शेतकऱ्यांना होईल.

५. शेतकऱ्यांना त्यांच्या शेताचे पाणी, पीक संरक्षण करण्यासाठी शस्त्रे लागतात ते बाळगण्याची परवानगी द्यावी ते राखण्याची जबाबदारी पोलिसांवर अथवा लष्करावर सोपवावी.

६. शेतीचा दर्जा सुधारण्यासाठी महात्मा फुलेंनी सांगितलेला उपाय म्हणजे तलाव-बंधारे सरकारने बांधावेत. डोंगर-टेकड्यांवरील गवत, पालापाचोळा, मेलेले कीटक व श्वापद यांच्या हाडा मांसाचे सत्त्व, पानाफुलांचे कुजलेले खत पावसाच्या पाण्याबरोबर वाहून जाऊ नये म्हणून जागोजागी तालीवजा बंधारे बांधावेत. त्यामुळे वळवाचे पाणी एकंदरीत शेतात मुरून नदी-नाल्यास मिळेल. असे केल्याने शेते सुपीक होतील.

७. पोलीस खात्यातील व लष्करातील शिपायांकडून डोंगर-टेकड्यामधील दऱ्याखोऱ्यानी तलाव-तळी जितकी होतील तितकी सोयीसोयीने बांधून काढावीत. म्हणजे त्यांच्या खालच्या प्रदेशात ओढ्याखोड्यांनी भर उन्हाळ्यात पाणी असल्यामुळे जागोजागी धरणे होतील. विहिरींना पाणी मिळेल आणि ठिकठिकाणी बागायती शेती करता येईल.

८. शेती धुपून त्यात खोंगळया (खड्डे) पडू नयेत म्हणून शेतकऱ्यांनी पाणलोटाच्या बाजूने शेतांच्या बांधांनी वरचेवर ताली दुरुस्त ठेवाव्यात.

९. शेती सुधारण्यासाठी महात्मा फुले यांनी विहिरी खोदणे हा एक उपाय सांगितला आहे. सरकारने आपल्या राज्यातील एकंदर सर्व शेतीची पाहणी करून पाणाड्यांकडून ज्या ठिकाणी भरपूर पाणी आहे त्या जागांच्या खुणा गावाच्या नकाशामध्ये नमूद कराव्या. जे शेतकरी सरकारच्या मदतीशिवाय विहिरी खोदून बांधून घेतील त्यांना बक्षीस देण्याची प्रथा सुरू करावी. नदी नाले व तळी-तलावात साचलेला गाळ शेतकऱ्यांना फुकट नेऊ द्यावा. जेणेकरून त्या शेतात पीक चांगले येईल व त्याचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल. ज्या ठिकाणी झरे सापडतील त्या ठिकाणी गावाच्या नकाशात नमूद करून विहिरी पाडाव्यात. या विहिरी स्वतः बांधणारास लहान-मोठी बक्षीस देण्याची सरकारने व्यवस्था करावी.

## निष्कर्ष :

१) महात्मा फुले यांचे पाणी व्यवस्थापन विषयक विचार आजही भारतीय शेतीसाठी अत्यंत उपयुक्त आहेत.

२) त्यांचे विचार आजही भारतीय कृषिला विकासाकडे घेऊन जाणारे आहेत.

३) सद्यस्थितीतही शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न हा गंभीर स्वरूपाचा असून महात्मा फुले यांनी सांगितलेल्या उपाययोजना प्रेरणादायी आहेत.

४) वाढत्या लोकसंख्येमुळे दरडोई पाण्याची उपलब्धता कमी होत चालली आहे. तसेच, वाढते शहरीकरण व औद्योगिकीकरणामुळे जलव्यवस्थापनावरील ताण वाढत चालला आहे. परिणामी पाणी व्यवस्थापन हे २१ व्या शतकातील एक प्रमुख आव्हान झाले आहे. त्यामुळे पाण्याचे व्यवस्थापन ही काळाची गरज बनली असून महात्मा फुले यांचे विचार व कार्य आजच्या शेतीच्या विकासासाठी व पाण्याच्या व्यवस्थापनासाठी निश्चितच मार्गदर्शक ठरतील असे आहेत.

५) शेताबरोबरच पाणी प्रश्नही आज महत्त्वाचा बनत चालला आहे. शेतीसाठी पाणी असणे मोठे गरजेचे आहे हे जोतीरावांनी ओळखले होते. म्हणूनच त्यांनी पाणी अडवा पाणी जिरवा ही घोषणा करून पाणी अडवून जमिनीची धूप होणे कसे थांबवावे याबाबत विचार मांडले. पाण्याची नासाडी होऊ नये असे त्यांचे मत होते. पाण्याचे वाटप करीत असताना ते नीट होत नाही म्हणून जोतीरावांनी असे विचार मांडले की प्रत्येक शेतकऱ्यास पाणी मोजून मापून मिळावे आणि प्रत्येकाला पाण्याची तोटी मिळाली म्हणजे त्यास पाटकऱ्यांवर अवलंबून राहावे लागणार नाही. आज महाराष्ट्रभर या दोन्ही विषयांची चर्चा होत असते. त्यासाठी चळवळी उभारल्या जात आहेत यावरून जोतीराव किती दृष्टे विचारवंत होते हे आपल्या लक्षात येईल.

## संदर्भ

१) महात्मा फुले समग्र वाङमय महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई. संपादक य.दि .फडके पृष्ठ क्रमांक २४५-३३१(शेतकऱ्याचा असूड ) व इशारा पृष्ठ क्रमांक ३८१-३९६

२) डॉ. अशोक चौसाळकर (१९९०) महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ, लोकवाङमय गृह , मुंबई.

३) ग.द. माळी (गुरुजी) (१९६७) महात्मा ज्योतिबा फुले, सुनील प्रकाशन, धुळे

४) कोर, धनंजय, महात्मा जोतीराव फुले -आमच्या समाज क्रांतीचे जनक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

५) पाटील पंढरीनाथ,(१९८९). म. जोतीराव फुले (दुसरी आवृत्ती), मनोविकास प्रकाशन, मुंबई.